भारत सरकार

**विधी, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# मसाला-पदार्थ उपकर अधिनियम, १९८६

**(सन १९८६ चा अधिनियम क्रमांक ११)**

[दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान]

# The Spices Cess Act, 1986

**(Act No. 11 of 1986)**

**[As in force on the 31st January, 2002]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[किंमत : रु. ४.००]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि स्पाईसेस सेस ॲक्ट, १९८६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी, २००३ यात पृष्ठ ९ ते १० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जानेवारी २००३.

**सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Spices Cess Act, 1986 as on the 31st January, 2002 contains the authoritative text of that Act in Marathi which was Published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January 2003 on pages 9 to 10.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 23rd January 2003.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

# मसाला-पदार्थ उपकर अधिनियम, १९८६

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. उपकर आकारणे व वसूल करणे.

४. अहवाल व विवरणे मागवण्याची शक्ती.

५. नियम करण्याची शक्ती.

एच ४१३१—२ (१०३५–१–२००४)

# मसाला-पदार्थ उपकर अधिनियम, १९८६

(१९८६ चा अधिनियम क्रमांक ११)

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान)

[२० मार्च, १९८६]

**मसाला-पदार्थांच्या निर्यातीचा विकास करण्यासाठी उपाययोजना करण्याच्या प्रयोजनार्थ जे मसाला-पदार्थ निर्यात केले जातात अशा सर्व मसाला-पदार्थांवर उपकर बसविण्याकरिता उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, "मसाला-पदार्थ उपकर अधिनियम, १९८६" असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) हा अधिनियम, केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "मंडळ" याचा अर्थ, मसाला-पदार्थ मंडळ अधिनियम, १९८६ चे कलम ३, याच्या पोट-कलम (१) खाली घटित मसाला-पदार्थ मंडळ, असा आहे;

(ख) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली तयार केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे;

(ग) "मसाला-पदार्थ" याचा अर्थ, मसाला-पदार्थ मंडळ अधिनियम, १९८६ च्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले मसाला-पदार्थ, असा आहे.

उपकर आकारणे व वसूल करणे.

३. (१) मसाला-पदार्थ मंडळ अधिनियम, १९८६ याच्या प्रयोजनार्थ [1][जे सर्व मसाला-पदार्थ निर्यात करण्यात येतात अशा निर्यात करण्यात येणाऱ्या मसाला-पदार्थांवर] केंद्र सरकार, वेळोवेळी अधिसूचनेद्वारे **राजपत्रामध्ये** विनिर्दिष्ट करील अशा पाच टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही अशा दराने उपकराच्या स्वरूपात मूल्यानुसार सीमाशुल्क आकारण्यात येईल व वसूल करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) खाली आकारण्यात येणारे सीमाशुल्क हे, सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याअन्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये मसाला-पदार्थांवर आकारणीयोग्य असणाऱ्या सीमाशुल्काच्या व्यतिरिक्त असेल.

(३) सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याचे उपबंध व त्याखाली तयार करण्यात आलेले नियम व विनियम तसेच शुल्काचा परतावा व शुल्कातून सूट या संबंधातील नियम यांचे उपबंध हे उक्त सीमाशुल्काच्या आकारणीस व वसुलीस शक्यतोवर, जसे ते त्या अधिनियमाखालील सीमाशुल्काच्या आकारणीस व वसुलीस लागू होतात, तसेच लागू होतील.

(४) पोट-कलम (१) खाली आकारणी केलेल्या सीमा शुल्काचे उत्पन्न प्रथम भारताच्या एकत्रीकृत निधीत जमा करण्यात येईल आणि संसदेने त्या संबंधातील कायद्याद्वारे केलेल्या विनियोजनाद्वारे तशी तरतुद केल्यास, केंद्र सरकार, अशा उत्पन्नामधून (वसुलीचा खर्च वजा केल्यानंतर) त्याला योग्य वाटेल अशा रकमा वेळोवेळी मंडळाकडे मसाला-पदार्थ मंडळ अधिनियम, १९८६ च्या प्रयोजनासाठी वापरण्याकरिता देईल.

अहवाल व विवरणे मागवण्याची शक्ती.

४. मंडळाला आवश्यकता वाटल्यास ह्या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी कोणत्याही निर्यातदाराला मसाला-पदार्थांच्या संबंधातील विहित करण्यात येईल अशी सांख्यिकीय व इतर माहिती तशा नमुन्यात व तेवढ्या कालावधीत सादर करण्यास फर्मावता येईल.

नियम करण्याची शक्ती.

५. (१) केंद्र सरकारला **शासकीय राजपत्रामध्ये** अधिसूचनेद्वारे, ह्या अधिनियमाच्या उपबंधांच्या अंमलबजावणीसाठी नियम करता येतील.

(२) विशेषत: व पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता, या नियमात कलम ४ खाली; ज्या नमुन्यात ज्या कालावधीत सांख्यिकीय व इतर माहिती पुरविण्यात येईल त्याबाबतचे उपबंध करता येतील.

---

१. १९८८ चा अधिनियम १९, कलम ३ व अनुसूची दोन द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही अपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रुपातच परिणामक होईल. किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई